
# मनोहरभाई पटेल महाविद्यालयाच्या रासेयो शिबीरात बार्टी तर्फे मार्गदर्शन



देवरीः- येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या हागदारीमुक्त ग्राम अभियानाकरिता युवाशक्ती या संकल्पनेअंतर्गत ग्राम भागी येथील विशेष वार्षिक शिबीरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे(बार्टी) तर्फे अंधश्रद्धा निर्मूलन व संविधानाच्या मुलभूत तत्वांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी भंडारा-गोंदिया जिल्हयाचे प्रमुख प्रकल्प अधिकारी सामाजिक न्याय विभाग बार्टीचे हृदय गोडबोले, तसेच राजाराम मेश्राम, महेंद्र कटबरिया, उद्धव निखारे उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी व शिबीर प्रमुख प्रा.सुनिता रंगारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. हृदय गोडबोले यांनी अंधश्रद्धांचे मूळ हे जातीव्यवस्थेमध्ये असून जाती नष्ट झाल्या

तपस्विता व तत्परता या तारूण्याच्या 'त' कारांचा उपयोग करून तरूणांनी स्वतःचा सर्वांगिण विकास करून घ्यावा, असेही ते म्हणाले. साकोली क्षेत्राचे समता दूत उद्धव निखारे यांनी समता म्हणजे केवळ समानता नसून धर्म, लिंग, वय

उपलब्धता म्हणजे खरी समता होय, असे प्रतिपादन केले. अंधश्रद्धांचे मूळ हे घरातील संस्कारांत असते. लहान वयात भुताची भिती दाखविल्यामुळे पुढे मोठे झाल्यावरही त्याच्या मनातून भूत जात नाही, त्यामुळे देवांपेक्षाही भूताची भिती वरचढ ठरते याचे उदाहरणांनी त्यांनी विवेचन केले. स्त्री-पुरूष समानता हा केवळ बोलण्याचा विषय आहे, प्रत्यक्षात तसे घडतांना दिसत नाही. ही समानता सहजपणे घराघरांत निर्माण व्हावी, पुरूषांनी घरातील कामे करणे हा कौतुकाचा किंवा हेटाळणीचाही विषय होता कामा

ठवता मिळणारी संधीची पृष्ठ क्र.६ वर...

# पान १ वरून...

## मुरपार लेंडेझरी ...

### चौकशी समिति नेमण्याची मागणी

सदर पाणी पुरवठा योजनेचे काम उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग(जि.प.) नवेगावबांध यांनी कामाची इस्टीमेट कॉपी तयार करून २० लाखाचे काम झाल्याचे दाखविले आहे. यामध्ये मुरपार येथील ग्रामसेवक सी.एस.हलाले व माजी पाणी पुरवठा अध्यक्ष, सचिव यांचे संगनमताने भ्रष्टाचार करण्यात आला आहे. सदर योजनेचे बांधकामाचे कंत्राट जय साई कंस्ट्रक्शन.कन्हारटोली, गोंदिया यांना देण्यात आले होते. कंत्राटदार यांनीसुद्धा सन २०१४ मध्ये काम बंद करून पळ काढला.मात्र ग्रामसेवक व माजी पाणी पुरवठा अध्यक्ष यांनी कंत्राटदाराला २१ सप्टेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१५ अंतर्गत आठ देयके देऊन पैसाची उचल केली आहे. या योजनेत शासनाची दिशाभूल करून २० लाखाची अफरातफर करण्यात आली. सदर योजनेचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे व अर्धवट असून या बांधकामाची जि.प.प्रशासनाने चौकशी समितीची नेमणूक करून दोषी अधिकाऱ्यांना त्वरित निलंबित करावे, तसेच सन २०१४ मध्ये या योजनेचे काम बंद करून कंत्राटदाराने पळ काढला. या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करून एफआयआर दाखल करावे.अशी मुरपार येथील नागरिकांनी मागणी केली आहे.

## मनोहरभाई पटेल ...

आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष गडवे यांनी मांडले तर प्रा.भास्कर डोंगरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या

...Society's,
MANOHARBHAI PATEL COLLEGE OF ARTS, COMMERCE AND SCIENCE, DEORI-441901, DIST.GONDIA (M.S.)
Website- www.mbpcdeori.com Email Id- mbpcdeori@gmail.com
Phone No. :- 07199-225110
( Accreditated by NAAC )

Ref No. -

Date- 09/12/2017

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात जागतीक एडस सप्ताह मार्गदर्शन व मोफत तपासणी

प्रेस नोट:

देवरी– येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात महाराष्ट्र एडस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत रेड रिबन क्लब आय सी टी सी, ग्रामीण रुग्णालय, देवरी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक एडस सप्ताहानिमीत्त एच.आय.व्ही/एडस बद्दल मार्गदर्शन व मोफत एच.आय. व्ही. तपासणीचे आयोजन करण्यात आले.

महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिता रंगारी व प्रा. आशिष गडवे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणातून प्रा. गडवे यांनी एचआयव्ही/एडस म्हणजे काय? व एखादयाच्या शरीरात एडस चा विषाणू कशा प्रकारे प्रवेश करतो याबद्दल माहिती दिली. शरिरातील पांढ–या पेशीमधे एचआयव्ही राहतो व त्यामुळे मनुष्याची एक्वायरड इम्युन सिस्टिम नष्ट होते, परिणामी रोग्याला दुय्यम आजाराची लागण होते व त्यात तो दगावतो इत्यादी बाबींचे त्यांनी सवीस्तर विश्लेषण केले.

देवरी ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक श्री. प्रमोद कळमकर यांनी आयसीटीसी च्या कार्याबद्दल माहिती सांगीतली तसेच एचआयव्ही व एडस यामधिल फरक विद्यार्थ्यांना समजावुन सांगीतला, एडस होण्याच्या चार कारणांबद्दल व एआरटीच्या उपचाराविषयी सवीस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारुण आपल्या शंकांचे निरसन करुन घेतले.

मार्गदर्शनपर कार्यक्रमांनंतर विद्यार्थ्यांच्या एचआयव्ही तपासणीसाठी देवरी ग्रामीण रुग्णालयाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ अर्चना बेदरकर यांनी विद्यार्थ्यांच्या रक्तांचे नमुने गोळा केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल डॉ. चंद्रमणी गजभिये, प्रा. भाष्कर डोंगरे तसेच प्रतिक गेडाम, यशवंत भोवते, पुजा गोहोने, संदीप गायधने, आयशा शेख, अमन मेश्राम, नरेश नेताम इत्यादि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी
मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य
महाविद्यालय, देवरी

LIBRARY

4 नवभारत
गोंदिया-भंडारा
26 जुलाई 2018



# मनोहरभाई पटेल कालेज में रोपे पौधे

देवरी (सं). मनोहरभाई पटेल महाविद्यालय में प्राचार्य डा.अरुण झिंगरे के मार्गदर्शन में महाविद्यालय परिसर में 100 पौधे लगाए गए. प्राचार्य झिंगरे ने पौधारोपण व पर्यावरण पर अपनी भूमिका रखते हुए पौधारोपण के महत्व समझाए. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनीता रंगारी ने प्रस्तावना रखी. नगर पंचायत देवरी द्वारा एक विद्यार्थी एक पौधा शासन की इस योजना की भी जानकारी विद्यार्थियों को दी गई. अपने जन्मदिन पर एक पौधा लगाकर उसका संवर्धन करने वाले विद्यार्थी को वर्ष के अंत में एक हजार रु. का पुरस्कार व प्रमाणपत्र दिए जाने वाले शासन के इस उपक्रम की मान्यवरों ने प्रशंसा की.

स (नागपुर) के लिए मुद्रक, प्रकाशक एवं संपादक विनोद माहेश्वरी द्वारा 108/जी-1 पांजरी रोड, खापरी, वर्धा रोड, नागपुर से मुद्रित तथा नवभारत भवन छत्रपति चौक, वर्धा रोड, नागपुर-4

लोकमत गुरुवार, दि. २ ऑगस्ट २०१८

# निसर्ग संवर्धनदिन साजरा

YAVATMAL COLLEGE LIBRARY DEORI

देवरी : येथील मनोहरभाई पटेल कनिष्ठ महाविद्यालयात निसर्ग संवर्धनदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त जनजागृती रैली, वृक्ष पूजन आणि वृक्ष लागवड करण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुणकुमार झिंगरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायत मुख्याधिकारी राजेश चिखलखुंदे, नगर पंचायत सदस्य पंचमवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पुराम, सचिन चौरसिया, सुनंदा भुरे उपस्थित होते. याप्रसंगी चिखलखुंदे यांनी, देवरी नगरी येथे पाच हजार झाडे लावणे व त्यांचे संगोपन करण्यासाठी नागरिकांना आवाहन केले. तसेच उपमुख्याधिकारी पुराम यांनी, वृक्षांचे महत्व व त्यांचे संवर्धन कसे करायचे याची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. झिंगरे यांनी, पर्यावरण समतोल बिघडले तर आपल्याला किती भयंकर परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे निसर्ग संवर्धन ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रास्ताविक टी.आर.देशमुख यांनी मांडले. संचालन डॉ. कल्पना घोषाल यांनी केले. आभार सुनंदा भुरे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे बीएससी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी तसेच एम.बी.पटेल कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमासाठी प्रा. वर्षा नंदेश्वर, मेघा रहांगडाले, दिक्षीता पटेल, शेंदरे, बेहरे व समस्त कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

मराठी दैनिक
लोकजान
(6) दि. 1 ऑगस्ट 2018

# एम.बी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात निसर्ग संवर्धन दिन साजरा




देवरी:- २८ जुलै रोजी मनोहरभाई पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व मनोहरभाई पटेल कनिष्ठ महाविद्यालय देवरी ह्यांच्या संयुक्त वतीने निसर्ग संवर्धन दिन मनोहरभाई पटेल कनिष्ठ महाविद्यालय देवरी येथे साजरा करण्यात आला.ह्या दिनानिमित्त जनजागृती रॅली,वृक्ष पूजन करून आणि वृक्षलागवड करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोहरभाई पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूणकुमार झिंगरे यांनी भुषविले.तर प्रमुख पाहुणे स्थानी देवरी नगर पंचाय कार्यकारी अधिकारी राजेश चिखलखुंदे,नगरपंचायत सदस्य पंचमवार,उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोंदिया जिल्हा पुराम,एम.बी.पटेल महाविद्यालयाचे रसानयशास्त्र विभाग प्रमुख प्रा.सचिन चौरसिया व सौ.सुनंदा भुरे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक टी.आर.देशमुख(शारिरीक शिक्षण) यांनी मांडली तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.कल्पना घोषाल वनस्पती विभाग प्रमुख ह्यांनी केले.चंद्रशेखर चिखलखुंदे देवरी नगरी येथे ५००० झाडे लावणे व त्यांचे संगोपण करण्यासाठी नागरिकांना आवाहन केले.तसेच उपमुख्याधिकारी पुराम साहेबांनी वृक्षाचे महत्व व त्यांचे संरक्षण कसे करायचे यांची माहिती दिली.शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झिंगरे यांनी संगितले की,वृक्ष संवर्धन हे काळाची गरज आहे.तसेच पर्यावरणाचे सम तोल बिघडले तर आपल्याला किती भयंकर परिणाम भोगावे लागतील म्हणून निसर्ग संवर्धन हे काळाची गरज आहे असे सांगितले.

आभार प्रदर्शन सौ.सुनंदा भुरे यांनी केले.कार्यक्रमाला एम.बी.पटल महाविद्यालयाचे बी.एस.सी प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच एम.बी.पटेल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरीता प्रा.वर्षा रंटावा, मेघा रहांगडाले,दिक्षिता पटेल, शेंडे, बेहरे व समस्त कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न केले.

## थोडक्य

### मोटारसाय

गोंदिया:- २९ जुलै रोजी सी.जे.कंपनीसमोर पाल चौक गोंि पिंटु चौधरी(५०)यांची मोटार ए.बी.१५७५ एच.एफ.डिलक्स ि नेली. फिर्यादीच्या तक्रारीवरून रा ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्या पुढील तपास पोहवा राऊत करीत

### मोबाईल

गोंदिया:- २६ जुलै रोजी छोटा गोंदिया संविधान चौक येथे ि (३२)यांच्या घरून पॅन्टच्या खि ११ हजार ४९० रूपयांचा माल फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीवि गुन्हा नोंद करण्यात आला आं पोहवा चौधरी करीत आहे.

### छपरीत ठेवलेली मं

# लिहिता-वाचता येणे म्हणजे साक्षर नव्हे

## अरुण झिंगरे : आंतरराष्ट्रीय सारक्षता दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : साक्षर असणे म्हणजे केवळ लिहिता वाचता येणे नव्हे. तर वेगवेगळ्या प्रकारचे कलागुण आत्मसात करुन व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणणे होय, असे प्रतिपादन प्राचार्य झिंगरे यांनी केले.

येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताहानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजीत कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. वक्ता म्हणून डॉ. सुधीर भांडारकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिता रंगारी उपस्थित होते.

डॉ. भांडारकर यांनी, शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी आपली संवेदन




कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तसेच मंचावर उपस्थित मान्यवर.

क्षमता व ऐकण्याची क्षमता वाढवली पाहिजे असे मत व्यक्त केले. तर प्रा.रंगारी यांनी, . साक्षरता ही व्यापक संकल्पना असून राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेबरोबरच कौशल्य विकसित करायची संधी देण्याचे माध्यम आहे, असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविकातून रासेयो कार्यक्रम अधिकारी आशिष गडये यांनी, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसामागचा इतिहास व भूमिका मांडली.

संचालन दिपंकर भोवते या विद्यार्थ्यांने केले. आभार प्रदर्शन अंजु तावाडे या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमासाठी मुकेश शर्मा, टिकेश्वरी सार्वा, चंद्रायणी नेवारे, अंजू तावाडे, शमा नान्हे, नजुत पठाण, विशाल पदे या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. बॉक्स विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा साक्षरता दिनाचे निमित्त साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'संगणक साक्षरता काळाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

निबंध स्पर्धेत अंशुल अमृतकर, दिपाली कच्छप, भुमेश्वर कावळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

नवभारत

# निसर्ग दिन मनाया




देवरी (सं). मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व मनोहरभाई पटेल कनिष्ठ महाविद्यालय देवरी के संयुक्त तत्वावधान में निसर्ग संवर्धन दिन पर जनजागृति रैली, वृक्ष पूजा व पौधारोपण कर कार्यक्रम की शुरुआत की गई. अध्यक्षता मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय के प्राचार्य डा.अरुणकुमार झिंगरे ने की.चिखलखुंदे ने शहर में 5,000 पौधे लगाने व उसकी देखभाल करने का आव्हान किया. देवरी नप के कार्यकारी अधिकारी राजेश चिखलखुंदे, नप सदस्य पंचमवार, पुराम, रसायन शास्त्र विभाग प्रमुख प्राचार्य सचिन चौरसिया, सुनंदा भुरे आदि उपस्थित थे. प्रस्तावना टी.आर.देशमुख ने रखी. संचालन डा.कल्पना घोषाल ने किया. आभार सुनंदा भुरे ने माना. सफलतार्थ वर्षा नंदेश्वर, मेघा रहांगडाले, दीक्षिता पटेल, शेंद्रे, बेहरे आदि ने प्रयास किया.

## पवन विद्यालय के छात्रों ने की वन यात्रा

पवनी (सं). वन परिक्षेत्र पवनी में विश्व बाल दिवस पर वन विभाग द्वारा हरित सेना के विद्यार्थियों को प्राणी व पक्षियों के प्रति रुचि निर्माण करने की दृष्टि से वन यात्रा कराई गई. पवन विद्यालय के 20 विद्यार्थी व हरित सेना प्रमुख चक्रधर मेश्राम, विनोद बावनकर, वन परिक्षेत्राधिकारी एस. एन. शेंडे, वनरक्षक मुंडे, कु.नेवारे, बरवेकर, भोसले, सोनवणे, मोरेश्वर राउत, विपीन तलमले ने वन यात्रा का आनंद उठाया. वनपरिक्षेत्राधिकारी शेंडे ने जंगल के प्राणी, पक्षी व वनस्पतियों पर विद्यार्थियों का मार्गदर्शन किया. हिरन व मोर के भी दर्शन विद्यार्थियों ने किए.

## ZP शाला में मनाई गुरु पूर्णिमा

आमगांव (सं). आमगांव पंस अंतर्गत जिप वरिष्ठ प्राथमिक केंद्रीय शाला कातूर्ली में मुख्याध्यापक एन. बी. बिसेन की अध्यक्षता में गुरु पूर्णिमा मनाई.

इस अवसर पर यू. जी. हठेवार, जी. पी. शहारे, जे. आर. हरिणखेडे, प्रीति भालाधरे, महेंद्र कुथे, ओमप्रकाश भुते, संदीप मेश्राम की उपस्थिति में गुरु पूर्णिमा मनाई गयी. विद्यार्थियों व खोब्रागडे ने गुरु के महत्व को विषद किया. मुख्याध्यापक बिसेन ने विद्यार्थियों को उनका पहला गुरु मां को बताया. संचालन सिमरन उके ने व आभार कोमल शेंडे ने माना.

Navabharat Gondia Bhandara Plus Edition
4 Aug, 2018 Page No. 4
Powered by : eReleGo.com

मराठी दैनिक
…कजन गोंदिया-भंडारा प्रवाह

सिहोरा…
जाहीरातीस…
रेखा अ…
वर संपर्क…
पाहिजे अ…
मो.१४२३…

B. PATEL COLLEGE LIBRARY

# …हरभाई पटेल महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर संपन्न




…येथील मनोहरभाई
…महाविद्यालयाच्या
…चे सात दिवसीय
…शिबीर नुकतेच ग्राम
…न्न झाले. ग्रामोन्नती
…त अभियानाकरिता
…या संकल्पनेवर
…बीराचे आयोजन
…ले. महाविद्यालयाचे
…रूण झिंगरे यांच्या
…ली झालेल्या या
…आयोजन कार्यक्रम
…सुनिता रंगारी व
…अधिकारी आशिष
…ले.
…शिबीराचे उद्घाटन
…यांच्या विकास
…प्रमुख नरेन्द्रजी जैन
…करण्यात आले.
…लताना त्यांनी
…मन जिकण्याचा
…राथ्यांना दिला
…झिंगरे यांच्या
…झालेल्या सदर
…डॉ.वर्षा गंगणे,
…व्हाण, विनोद
…लिस पाटील भागी,
…र मुख्याध्यापक
…ळा भागी, रेखा
…गणवाडी सेवीका
…अतिथी म्हणून
…ते. आपल्या
…णातून डॉ.अरूण
…बीराथ्यांना त्यांच्या
…विकासासाठी
…र्शन केले.
…च्या दैनदिनीनूसार
…क कार्यक्रमांतर्गत
…१५० व्या जयंती
…पर व्याख्यानाचे
…ण्यात आले होते.
…डारकर यांच्या
…ली झालेल्या या
…डॉ.अभिनंदन

पाखमोडे यांनी म.गांधीजींच्या आरोग्यविषयक कार्याचा आढावा घेतला. डॉ.सुधीर भांडारकर यांनी म.गांधीजीचे विचार आजही किती प्रासंगीक आहेत, हे विविध उदाहरणांनी पटवून दिले. बौद्धीक कार्यक्रमांतर्गत झालेल्या एका सत्रात सामाजिक समस्यांवर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. डॉ.कल्पना घोषाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सचिन चौरासिया यांनी, 'सोशल मिडीयाच्या' अतिवापरावर व गैरवापरावर प्रकाश टाकला. समुपदेशक सौ.पदमा मदारकर यांनी आपल्या देशात महिलांवर होणाऱ्या कौटुंबीक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांवर चिंता व्यक्त केली. महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. डॉ.कल्पना घोषाल यांनी अध्यक्षीय भाषणातून पर्यावरण संरक्षण हे सामाजिक संरक्षणांशी कसे निगडीत आहे. हे विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

"आरोग्य आणि व्यक्तिमत्व विकास" या विषयांवर झालेल्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात ग्रामीण रूग्णालय-देवरीचे दंत चिकित्सक डॉ.रूपचंद भेंडारकर यांनी 'मौखिक आरोग्यावर' मार्गदर्शन केले. डॉ.त्रिमुर्ती लांबट यांनी व्यक्तीमत्व विकास हा आपल्या आरोग्याशी कसा निगडीत असतो याचे विवेचन केले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ.चंद्रमणी गजभिये यांनी शिबीरार्थ्यांना व्यक्तीमत्व विंकासासाठी दहा सुत्र सांगीतली.

ग्रामीण रूग्णालय देवरीच्या वतीने शिबीरांत सिकलसेल, एच.आय.व्ही.थॉयरॉइड, सी.बी.सी साठी मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. रेड रिबन क्लब व आय.टी.सी.सी.च्या वतीने समुपदेशक प्रमोद कळमकर, सौ.अर्चना बदेरकर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नितेश गजभिये, सौ.भारती भेंडारकर यांनी या शिबीरात सहभाग घेतला. सात दिवसीय शिबीरात शिबीरार्थ्यांनी रोज गांवात जाऊन ग्रामस्वच्छता केली. घरांघरात जाऊन प्लास्टीक न वापरण्याबाबत संदेश दिला. शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन डॉ.अरूण झिंगरे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा गोदावरी उदापुरे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन आशिष गडवे यांनी केले. उमे… चव्हाण यांनी शिबीरासंबं… आपले विचार मांडले तसेच क… शिबीरार्थ्यांनी आपले मनोग… व्यक्त केले. डॉ.अरूण झिंग… यांनी आपल्या अध्यक्षी… भाषणातून शिबीरार्थ्यांच्या भा… जीवनासाठी शुभेच्छा दिल्या… सुनिता रंगारी यांनी संपू… शिबीराच्या यशस्वितेसाठी प्रत्य… व अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्… सर्वांचे आभार मानले. रा.से.यो.… शिबीर म्हणजे, 'माणू… घडविणारी कार्यशाळा आहे' अ… मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी शिबीर सहाय्यक म्हणून उमे… चव्हाण, भास्कर डोंगरे तसे… विद्यार्थी प्रतिनिधी धीरज राऊत, रोहित नंदेश्वर, दिपंकर भोवते, मुकेश शर्मा, कुलदिप बघे… यांनी तर विद्यार्थीनी प्रतिनि… म्हणून गुंजन जैन, धे… नंदेश्वर, तेजस्वी कांबळे, नुजत पठान, गायत्री डोंगरवा… यांनी सहकार्य केले.

## कामठा येथे स्वच्छता अभियान



**कामठा:-** येथे ग्राम पंचायत सदस्य मिलन पाथोडे यांच्या नेतृत्वात व बजरंग दल खंड कामठा यांच्या वतीने चिमनाबहादुर चौक परिसरात साफसफाई करण्यात आली. या स्वच्छता अभियानात ललित राऊत, सुभाष गायधने, संजय आसोले, लोकेश पाथोडे, दिपक मेंढे, आकाश महारवाडे, कमलेश भावे, पवन दोनोडे, दिपक कोरे, पंकज बावनकर, जीतू गरादे, छोटू गायधने, सुमित गायधने, वैभव पाथोडे, लोकेश पाथोडे, यांनी मिळून परिसर स्वच्छ केले.

## सामान्य कु…

**आमगाव:-** सामा… कुटूंबातील आणि वडिलाचे शिक्ष… तिसरी पर्यंत या परिस्थितीत स… लेखापाल (सिए) परिक्षा उत… करून बनगाव येथील सं… रामेश्वर फुंडे यांनी यशाचे शि… गाठले. तालुक्यातील बन… येथील रामेश्वर फुंडे यांचा छो… किराणाचा व्यवसाय आहे. त… शिक्षण फक्त तिसऱ्या वर्गाप… पण त्यांनी आपल्या आ… परिस्थितीशी झुंज देवून मु… सि,ए होण्यास मदत केली.

संदिपनी वयाच्या २२ व… परिक्षा उत्तीर्ण केली. सिए…

सकाळ
गुरुवार
२६ जुलै २०१८ | ३२

LIBRARY COLLEGE DEORI



देवरी : वृक्षरोपांसह उपस्थित विद्यार्थी व शिक्षक.

# पटेल महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण

देवरी : येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे होते. त्यांनी वृक्षारोपणाबद्दल भूमिका विशद केली. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी यांनी केले. नगरपंचायत देवरीतर्फे एक विद्यार्थी एक वृक्ष या शासनाच्या योजनेचीही माहिती या वेळी देण्यात आली. वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षाचे रोपटे लावून त्याचे संवर्धन करणाऱ्या विद्यार्थ्याला वर्षाअखेर एक हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्याच्या शासनाच्या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

मराठी दैनिक
लोकजन
(6) दि.19 सप्टेंबर 2018

M. B. PATEL COLLEGE LIBRARY DEORI

47

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताहनिमित्त' निबंध स्पर्धा



देवरी:- येथील 'मनोहरभाई पटेल महाविद्यालयात, आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताहनिमित्त' राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संगणक साक्षरता काळाची गरज या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताहनिमीत्त' महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ता म्हणुन डॉ.सुधीर भांडारकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी सुनिता रंगारी उपस्थित होते. साक्षर असणे म्हणजे केवळ लिहता वाचता येणे नव्हे तर वेगवेगळ्या प्रकारचे कलागुण आत्मसात करून व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणने होय. असे प्रतिपादन प्राचार्य अरूण झिंगरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी आपली संवेदनक्षमता व ऐकण्याची क्षमता वाढवली पाहीजे असे विचार डॉ.सुधीर भांडारकर यांनी यावेळी व्यक्त केले. साक्षरता ही व्यापक संकल्पना असून राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेबरोबरच कौशल्य विकसीत करायची संधी देण्याचे माध्यम आहे असे मत सुनिता रंगारी यांनी मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक रा.से.यो.सहकार्यक्रम अधिकारी आशीष गडवे यांनी मांडले. आपल्या प्रास्तावीक भाषणातून त्यांनी आंतरराष्ट्रीय साक्षरता-दिवसामागचा इतीहास व भूमीका विशद केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे संचालन दिपकर भोवते या विद्यार्थ्याने केले तर आभार प्रदर्शन कु.अंजु तावाडे या विद्यार्थीनीने केले. कार्यक्रमाची सुरूवात पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यापिठ गीत सादर करण्यात आले. निबंध स्पर्धेत अंशुल अमृतकर, कु.दिपाली कच्छप व कु.भुमेश्वरी कावळे हे विद्यार्थी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतिय क्रमांकाने विजयी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुकेश शर्मा, टिकेश्वरी सार्वा, चंद्रायणी नेवारे, अंजु तावाडे, शमा नान्हे, नुजत पठाण, विशाल पदे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक व प्रकाशक दिलीप पारधी यांनी हे वृत्तपत्र लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह
करून लोकजन कार्यालय,लोकजन भवन, डॉ. लोहिया वार्ड, टी. बी. टोली गोंदिया येथून प्रकाशित केले. मुख्य संपादक- ए
०७१८२-२५१४२५,२५०२३१ भ्रमणध्वनी ९४२३११३०३३ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याव
ई-मेल-lokjanprakashan@yahoo.com, lokjanprakashan@gmail.com,lokjanprakashan1@g

मराठी दैनिक लोकजनमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख व स्तंभलेखन यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमतच असती

मराठी दैनिक
लोकजन
(6) दि. 14 ऑगस्ट 2018

COLLEGE LIBRARY DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात स्वच्छता पखवाड्याला सुरवात



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात स्वच्छता पखवाडयास मोठया उत्साहात सुरवात करण्यात आली. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान चालणाऱ्या या अभियानाची सुरवात स्वच्छता शपथ घेवून करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे व प्रमुख अतिथी व वक्ता म्हणून भागी देवरी गावचे पोलीस पाटील विनोद अमृतकर उपस्थित होते. प्रदुषण करणाऱ्या वस्तूंचा वापर कमी करणे म्हणजे पर्यावरणाची स्वच्छता होय असे प्रतिपादन प्राचार्य झिंगरे यांनी व्यक्त केले. स्वच्छतेमुळे साथीचे रोग कसे पसरतात व त्यांमुळे सर्वांचेच आरोग्य धोक्यात येते, तेव्हा स्वच्छता ही पाळलीच पाहिजे असा संदेश विनोद अमृतकर यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून दिला. वर्षभर प्रत्येकाने शंभर तास स्वच्छतेसाठी देण्याची यावेळी शपथ घेतली. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी यांनी केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. सहकार्यक्रम अधिकारी प्रा.आशीष गडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नंदकिशोर भोवते, मुकेश शर्मा, टिकेश्वरी सार्वा, चंद्रायणी नेवारे, अंजु तावाडे, शमा नान्हे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# लिहिता-वाचता येणे म्हणजे साक्षर नव्हे : झिंगरे



**प्रतिनिधी**/१६ सप्टेंबर

**देवरी :** साक्षर असणे म्हणजे केवळ लिहिता वाचता येणे नव्हे, तर वेगवेगळ्या प्रकारचे कलागुण आत्मसात करून व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणणे होय, असे प्रतिपादन प्राचार्य झिंगरे यांनी केले.

## आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा

येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताहानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. वक्ता म्हणून डॉ.सुधीर भांडारकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी उपस्थित होते. डॉ.भांडारकर यांनी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी आपली संवेदन क्षमता व ऐकण्याची क्षमता वाढवली पाहिजे, असे मत व्यक्त केले. तर प्रा.रंगारी यांनी साक्षरता ही व्यापक संकल्पना असून राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेबरोबरच कौशल्य विकसीत करायची संधी देण्याचे माध्यम आहे. असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविकातून रासेयो कार्यक्रम अधिकारी आशिष गडवे यांनी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसामागचा इतिहास व भूमिका मांडली.

संचालन दिपकर भोवते या विद्यार्थ्यांचे केले. आभार प्रदर्शन अंजू तावाडे या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमासाठी मुकेश शर्मा, टिकेश्वरी सार्वा, चंद्रायणी नेवारे, अंजू तावाडे, शमा नान्हे, नुजत पठाण, विशाल पदे या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. बॉक्स विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा साक्षरता दिनाचे निमित्त साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी संगणक साक्षरता काळाची गरज, या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात अंशुल अमृतकर, दिपाली कच्छप, भुमेश्वर कावळे यांनी अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

देशोन्नती ६ ■ शनिवार, दि. २९ सप्टेंबर २०१८
epaper.deshonnati.com

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

प्रतिनिधी/२८ सप्टेंबर

देवरी : येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून डॉ.वर्षा गंगणे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी उपस्थित होते.

'खरा तो एकची धर्म,जगाला प्रेम अर्पावे' या साने गुरूजींया प्रार्थनेप्रमाणे रासेयो विद्यार्थ्यांनी आचरण ठेवावे असा संदेश प्राचार्य अरूण झिंगरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिला. डॉ.वर्षा गंगणे यांनी 'मेरा देश महान, मै हु देश की शान' हा उद्देश रासेयो विद्यार्थ्यांनी बाळगावा असे प्रतिपादन केले. प्रा.सुनिता रंगारी यांनी रासेयो ही विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करूण देऊन त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात मोलाचे योगदान करते याबत सविस्तर विवेचन केले.




कार्यक्रमाची सुरूवात पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यापिठगीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुकेश शर्मा, टिकेश्वरी सार्वा, गुंजन जैन, चंद्रायणी लेवारे, अंजु तावाडे, शमा नान्हे, नुजत पठाण, विशाल पदे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

दैनिक लोकमत, दि. १०/१०/२०१८

LIBRARY DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात महात्मा गांधी व शास्त्री जयंती साजरी



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रपीता महात्मा गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणुन डॉ.अभिनंदन पाखमोडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी सुनिता रंगारी व सहकार्यक्रम अधिकारी आशिष गडवे यांनी केले.

मारामारी न करणे म्हणजे अहिंसा नव्हे तर व्यक्तीच्या दैनंदिन आचरणातून अहिंसा व्यक्त झाली पाहिजे असा संदेश यावेळी डॉ.झिंगरे यांनी दिला. म.गांधीच्या विचारांवर कार्य करणाऱ्या लोकांना शांततेचे नोबेल मिळाले, पण महात्माजींना मिळाले नाही. असे प्रतिपादन डॉ.पाखमोडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून रंगारी यांनी महात्माजींच्या स्वदेशी, स्वावलंबन व स्वाभीमान या त्रिसूत्रीचा आढावा घेतला. गडवे यांनी महात्माजींच्या स्वप्नातील भारत व आजचा भारत यातील विसंगती विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिली.

कार्यक्रमाची सुरुवात म.गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर वंदना नेताम व चमुने विद्यापीठ गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन कु.नंदेश्वर व आभार प्रदर्शन कु.शारदा परसगाये यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिपकर भोवते, धीरज राऊत यांनी परिश्रम घेतले.

दि. 11 ऑक्टोबर 2018

मराठी दैनिक

लोकमत गोंदिया - भंडारा प्रवाह

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात स्वच्छता रॅली व श्रमदान

देवरी:- येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात, महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी व प्रा.भास्कर डोंगरे यांनी या रॅलीचे आयोजन केले.



महात्मा गांधी की जय, स्वच्छ भारत सुंदर भारत, हम सबने यह ठाना है, भारत स्वच्छ बनाना है, स्वच्छता ही सेवा असे फलक हातात घेऊन व घोषणा देत महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी या रॅलीचे सुरूवात केली. अग्रसेन चौक, चिचगड रोड व नगर पंचायत कार्यालयास वळसा घालून रॅली पुन्हा महाविद्यालयात परत आली. रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे व महाविद्यालयातील इतर विद्यार्थी मिळून जवळपास तिनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रॅली परतल्यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरातील केरकेचरा व गवत काढून श्रमदान केले. रॅलीच्या यशस्वितेसाठी राकेश टेंभुरकर, धीरज राऊत, कुलदिप बघेल, दीपंकर भोवते, रोहित तुरकर, गुंजन जैन, धैर्या नंदेश्वर, नुजत पठान इत्यादी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

मराठी दैनिक
लोकजन गोंदिया-भंडारा प्रवाह

M.B. PATEL COLLEGE LIBRARY DEORI

१८/०१/२०१९

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी




देवरी:- येथील 'मनोहरभाई पटेल महाविद्यालयात,१२ जानेवारीला रा.से.यो.विभागातर्फे 'राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती' संयुक्तपणे

पृष्ठ क्र.६ वर

**मनोहरभाई पटेल ....**

साजरी करण्यात आली. 'महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.आशिष गडवे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मा.जिजाऊ होत्या म्हणुन शिवाराय घडले.असे प्रतिपादन डॉ.अरूण झिंगरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.प्रा.गडवे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला.कार्यक्रमाचे संयोजन व प्रास्तावीक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन कुलदीप बघेल यांनी केले तर आभार धीरज राऊत या विद्यार्थ्यांने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बरखा लाडे,नुजत पठाण,गुजंन जैन,दीपंकर भोवते,दीप मेश्राम या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मनोहरभाई पटेल महाविद्यालय



देवरी : येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयाच्या रासेयो विभागाच्या ग्रामोन्नती व स्वच्छ भारत अभियानाकरीता युवाशक्ती या संकल्पनेवर आधारीत ग्राम भागी येथील सात दिवसीय विशेष वार्षीक शिबरात स्वच्छता रैलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीचे आयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिता रंगारी व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष गडवे यांनी केले. महात्मा गांधीजीच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून या रॅलीमध्ये महात्मा गांधीजीका एक ही सपना, स्वच्छ भारत हो भारत अपना, हिंसा छोडो, देश जोडो अशा घोषणा देण्यात आल्या. रॅलीच्या यशस्वीतेसाठी प्रा. उमेश चव्हाण, प्रा. भास्कर डोंगरे तसेच विद्यार्थी प्रतिनिधी धीरज राऊत, रोहीम नंदेश्वर, दिपकर भोवते, मुकेश शर्मा, कुलदिप बघेल यांनी तर विद्यार्थीनी प्रतिनिधी गुंजन जैन, धैर्या नंदेश्वर, तेजस्वी कांबळे, नुजत पठाण, गायत्री डोंगरवार यांनी सहकार्य केले.

Scanned with OKEN Scanner

Gondia Education Society's,
**MANOHARBHAI PATEL COLLEGE OF ARTS, COMMERCE AND SCIENCE, DEORI-441901, DIST.GONDIA (M.S.)**
Website- www.mbpcdeori.com Email Id- mbpcdeori@gmail.com
Phone No. :- 07199-225110
( Accreditated by NAAC )

Ref No. -

Date- 16/10/2018

प्रेस नोट

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस संपन्न

**देवरी:** येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल डॉ. चंद्रमणी गजभिये यांनी केले. डॉ. कलामासारखे महामानव हे शुन्यातून विश्व निर्माण करतात, असे प्रतिपादन डॉ. झिंगरे यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी प्रा. रविंद्र निमजे, प्रा. जयपाल चव्हान, डॉ. वर्षा गंगणे, प्रा. सुनिता रंगारी, प्रा. आशिष गडवे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. वाचन प्रेरणा दिवसानिमीत्त ग्रंथालयाचा वापर जास्त करणा–या 20 विद्यार्थ्यांना डॉ. गजभिये, ग्रंथपाल यांनी 'अण्णाभाऊ साठे– गौरव ग्रंथ' भेट म्हणून दिले. प्रा. रंगारी यांनी ग्रंथालयाला 'स्टीव्ह जॉब्झ' यांचे चरीत्र भेट म्हणून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कुलदीप बघेले, दिपंकर भोवते, गंजन जैन, जितेश कोसरकर, दर्शना सहारे इ. विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

PRINCIPAL
Manoharbhai Patel College of
Arts, Commerce & Science, Deori
Dist. Gondia (M.S.) 441901

Gondia Education Society's,
**MANOHARBHAI PATEL COLLEGE OF ARTS, COMMERCE AND SCIENCE, DEORI-441901, DIST.GONDIA (M.S.)**
Website- www.mbpcdeori.com Email Id- mbpcdeori@gmail.com
Phone No. :- 07199-225110
( Accreditated by NAAC )

34

Date- 31/10/2018

Ref No. -

प्रेस नोट

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात "राष्ट्रीय एकता दिवस" संपन्न

**देवरी:** येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन व प्रस्तावीक ग्रंथपाल डॉ. चंद्रमणी गजभिये यांनी केले. डॉ. झिंगरे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला, शासनाने पाठविलेल्या पत्रान्वये शपथ घेण्यात आली आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. तसेच कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी डॉ. सुधीर भांडारकर, प्रा. आशिष गडवे, प्रा. भाष्कर डोंगरे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सुनिल खळोदे, सुरेंद्र रामटेके, मनजीतसींग निर्वाण, दत्तु कागदे, वंदना लाखडे, गीता उइके, बरखा लाडे, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कुलदीप बघेले, इ. विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

प्राचार्य
PRINCIPAL
Manoharbhai Patel College of Arts, Commerce & Science, Deori, Dist. Gondia (M.S.) - 441901

Scanned with OKEN Scanner

2 नवभारत
गोंदिया-भंडारा
2 नवंबर 2018

M. B. PATEL LIBRARY DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालय में राष्ट्रीय एकता दिन मनाया

देवरी (सं). मनोहरभाई पटेल महाविद्यालय में ग्रंथालय विभाग द्वारा सरदार वल्लभभाई पटेल की जयंती को राष्ट्रीय एकता दिवस प्राचार्य अरुण झिंगरे की अध्यक्षता में आयोजित हुआ. प्रस्तावना ग्रंथपाल डा.चंद्रमणी गजभिए ने रखी. डा.झिंगरे ने सरदार पटेल के जीवन पर प्रकाश डाला. इस दौरान सभी ने राष्ट्रीय एकता की शपथ ली.

सफलतार्थ डा.सुधीर भांडारकर, प्राध्यापक आशीष गढ़वे, प्रा.भास्कर डोंगरे, सुनील खरोदे, सुरेंद्र रामटेके, मनजीतसिंह निर्वाण, दत्तू कागदे, वंदना लाखडे, गीता उइके, बरखा लाडे, कुलदीप बघेले ने प्रयास किया.

## माडल फोटो प्रतियोगिता में जय द्वितीय

भंडारा (का). राहुल बहुउद्देशीय

मराठी दैनिक
लोकजन
दि.13 डिसेंबर 2019

LIBRARY

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयातर्फे एचआयव्ही एड्स जनजागृती रॅली



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सामान्य ग्रामीण रुग्णालय देवरीच्या आयसीटीसी विभागातर्फे जागतिक एड्स सप्ताहानिमित्त रॅली काढून जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे व रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी यांच्या मार्गदर्शनात या रॅलीचे आयोजन करण्यात आले. आय.सी.टी.सी.तज्ञ प्रमोद कळमकर,रा.से.यो.सहकार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष गडले यांनी या रॅलीचे नेतृत्व केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांनी हिरवी झेंडी दाखवून महाविद्यालयातून रॅली रवाना केली. अग्रसेन चौक येथे रॅलीचे सांगता करण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी 'मिळून सारे सामना करू, महाराष्ट्र आपला एड्स मुक्त करू, नैतिकता पाळा,एड्स टाळा, 'कर तपासणी एचआयव्ही एड्सची हमी [illegible] आयुष्याची' अशा घोषणा देत जनजागृती केली. रॅलीमध्ये आयसीटीसी चे सदस्य, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.गायत्री गुप्ता व सुनिल भलोटे यांनी परिश्रम घेतले.

LIBRARY
DEORI

The Hitavada
NAGPUR ■ Wednesday ■ December 11 ■ 2019

# Manoharbhai Patel College, Deori



Students and teachers participating in the rally.

AIDS awareness rally was take out by NSS Department of Manoharbhai Patel, Arts, Commerce and Science College, Deori, and Rural Hospital, Deori. The rally was organised under the guidance of Dr Arun Zingare, Princiopal, and Sunita Rangari, NSS Programme Officer. Pramod Kalamkar, ICTC expert, and Ashish Gadhve of NSS, led the rally. Dr Arun Zingare flagged off the rally. Gayatri Gupta, Sunil Khalode and others worked hard for the success of the programme.

Colleges in Vidarbha can send their news items on
**vidarbhaline@gmail.com**

# रासेयो शिबिरात मोफत एचआयव्ही सीकलसेल तपासणीचे आयोजन



देवरी:– येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ग्राम शेडेपार येथे संपन्न झालेल्या वार्षिक शिबिरात ग्रामीण रूग्णालय देवरीच्या वतीने एचआयव्ही एड्स सिकलसेल व सिबीसीची मोफत तपासणी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात आयसीटीसी समुपदेशक प्रमोद कळमकर, जिल्हा रुग्णालय गोंदिया यांच्या नेतृत्वात मितेश गजभिये व भारती भेंडारकर यांच्या टीमने रासेयो स्वयंसेवकांच्या रक्ताचे नमुने गोळा केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी व काही स्वयंसेवकांनीही तपासणी करून घेतली.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता रंगारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या कार्यक्रमात आरोग्यविषयक चर्चेचे आयोजन करण्यात आले. कळमकर यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही, सिकलसेल या आजाराबद्दल माहिती दिली. ध्यान व योगसाधनेद्वारे आपण आपली रोगप्रतिकार शक्ती वाढवू शकतो, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन शिबीर प्रमुख प्रा.आशिष गडवे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.मायकल गुप्ता, सुबोध भुरे तसेच दिपंकर भोवते, सिद्धी डोये, अंशूल अमृतकर, सूजत पठाण या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# एड्स नियंत्रणात युवकांचा सहभाग महत्त्वाचा

## अरुण झिंगरे : पटेल महाविद्यालयात रेड रिबन क्लब वॉलचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क




फीत कापून रेड रिबन वॉलचे उद्घाटन करताना डॉ.अरुण झिंगरे.

**देवरी :** जाणीव व जागृती असल्यास एड्सपासून बचाव करता येतो. यासाठी एड्स नियंत्रणात युवकांचा सहभाग सर्वात महत्वाचा आहे असे प्रतिपादन येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांनी केले.

येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्तवतीने महाविद्यालयात तयार करण्यात आलेल्या रेड रिबन क्लब वॉलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्रा. आशिष गडये, प्रा. सचिन चौरसिया, डॉ. चंद्रमनी गजभिये, डॉ. सुधीर भांडारकर, डॉ.अभिनंदन पाखमोडे, डॉ. त्रिमुर्ती लांबट प्रामुख्याने उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनिता रंगारी यांच्या मार्गदर्शनात रेड रिबन क्लबचे अध्यक्ष अंशूल अमृतकर तसेच राणी लांजेवार, दिपंकर भोयते, हिमांशू शर्मा, भुमेश्वरी कावळे या पदाधिकाऱ्यांनी सभा घेऊन रेड रिबन संबंधित मजकूर प्रसिद्ध करण्यासाठी महाविद्यालयात एक वॉल असावी असा प्रस्ताव मांडला होता. त्याला प्राचार्य डॉ. झिंगरे यांनी मंजुरी देत रेड रिबन क्लबसाठी वॉल उपलब्ध करुन दिली.

या वॉलवर 'एड्स नियंत्रण' या विषयावर काव्य, स्लोगन, लेख, पोस्टर अशा विविध स्वरुपातील मजकूर प्रसिद्ध करण्यात येईल असे प्रा. रंगारी यांनी सांगितले.

www.tarunbharat.net
तरुण भारत — सोमवार, २० जानेवारी २०२०

M. B. PATEL COLLEGE LIBRARY



रॅलीत सहभागी विद्यार्थी व शिक्षक

# देवरी येथे 'फीट इंडिया सायक्लॉथॉन'चे आयोजन

देवरी, १९ जानेवारी

येथील मनोहरभाई पटेल महाविद्यालयात १८ जानेवारी रोजी प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात 'फीट इंडिया सायक्लॉथॉन'चे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्राच्या वतीने आयोजित या सायक्लॉथॉनसाठी मनोहरभाई पटेल व बी. एड. विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीचा समारोप बाबूराव मडावी विद्यालयात करण्यात आला. मानवी आरोग्य व प्रदूषणमुक्त जीवनासाठी सायकल चालविण्याची सवय नागरिकांना लागावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी, डॉ. अभिनंदन पाखमोडे, प्रा. डोंगरे, प्रा. गायत्री गुप्ता, प्रवीण गुरुमानी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

---

लोकमत — मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०१९ — ३

# देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माण या परस्पर पूरक बाबी

## विद्यार्थ्यांनी व्यक्त केले मत : पटेल महाविद्यालयात तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : देशभक्ती व राष्ट्रनिर्माण या परस्परपूरक बाबी आहेत. परंतु केवळ राष्ट्रगान व [illegible] गायन म्हणून देशभक्ती केली जाऊ शकत नाही असे मत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मनोहरभाई पटेल महाविद्यालयातील स्पर्धकांकडून व्यक्त करण्यात आले. [illegible] मनोहरभाई पटेल महाविद्यालयात [illegible] 'देशभक्ती व राष्ट्रनिर्माण' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेत रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिता रंगारी यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते. [illegible]



विजेत्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना डॉ. अरुण झिंगरे व अन्य.

तालुका समन्वयक राजेश टेंभरे, तालुका समन्वयक भयदीप शहारे, शुभम [illegible] व माईशाम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रेम कोसरकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व स्वामी विवेकानंद यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या स्पर्धेत मनोहरभाई पटेल महाविद्यालय, [illegible] महिला महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एकूण [illegible] विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेत मनोहरभाई पटेल महाविद्यालयातील [illegible], मंजुषा नंदागवळी व [illegible] यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी विद्यार्थ्यांचे प्राचार्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले. प्रेम कोसरकर, व प्रा. सुनिता रंगारी यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. सदर विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी गोंदिया येथे पाठविण्यात येणार आहे. [illegible] कार्यक्रमासाठी [illegible] सहकार्य केले.

मराठी दैनिक
लोकजन
गोंदिया - भंडारा प्रवाह
दि. 19 सप्टेंबर 2019

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त जलसाक्षरता



देवरी:– येथील मनोहरभाई पटेल महा. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त रासेयो विभागातर्फे जलसाक्षरता या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात साईग्राम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व पाणलोट विभाग, गडचिरोली चे कार्यवाह प्रेम कोसरकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलतांना कोसरकर यांनी ग्रामीण भागातील पाणी व्यवस्थापन कसे असावे याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शोषखड्डे प्रत्येकाने घरी असलेच पाहिजेत असे सांगून रेन वाटर हार्वेस्टिंग या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रक्रियेद्वारे जमा झालेल्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी, घरगुती वापरासाठी व पिण्यासाठी करता येतो. याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पाणी फाउंडेशन बद्दलही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्रा.डॉ.अरूण झिंगरे यांनी पाणी व्यवस्थापनात आपले पूर्वज आपल्यापेक्षा हुशार होते, असे प्रतिपादन केले. शास्त्रशुद्ध विकासाच्या तत्त्वानुसार पाण्याचा वापर केला पाहिजे हे त्यांनी उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिता रंगारी यांनी केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून त्यांनी केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे साक्षर असणे नव्हे तर जलसाक्षरता, ऊर्जासाक्षरता, संगणक साक्षरता या काळानुरूप आवश्यक असणाऱ्या गोष्टींबाबत साक्षर असणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मुकेश शर्मा यांनी केले तर अंशुल अमृतकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी माधवी गुप्ता, सुनिता खलोदे या कर्मचाऱ्यांनी रासेयो हिमांशु शर्मा, सिद्धी डोये, दीपिका शाहू, वैशाली कापसे, दिप मेश्राम, मुजर पठाण या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

मराठी दैनिक
लोकजन
दि. 8 ऑक्टोंबर 2019

LIBRARY

# मतदार जागृती कार्यक्रमाचे आयोजन



देवरी:– मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देवरीच्या वतीने प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृती कार्यक्रमाचे आयोजन डॉ.देवेंद्र बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. याप्रसंगी विचारमंचावर प्रा.डॉ.के. एल. देशपांडे, डॉ.चंद्रमणी गजभिये उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा. जयपाल चव्हाण यांनी केले.

मुकेश शर्मा, जितेश कोसरकर, दिपंकर भोवते आणि प्रमोद जांभुळकर विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. मतदार आणि मतदान याबद्दल त्यांनी आपल्या भाषणातून महत्त्वपूर्ण विचार मांडलेत. प्रा. डॉ. के.एल.देशपांडे आणि डॉ. चंद्रमणी गजभिये यांनी मतदारांनी योग्य पद्धतीने निर्भीडपणे मतदान मोठ्या प्रमाणात करण्याचे आवाहन केले. प्रा.डॉ.देवेंद्र बिसेन आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, मतदाराने योग्य उमेदवारांची निवड

पृष्ठ क्र.६ वर...

ARBHALine

The Hitavada
NAGPUR ■ Monday ■ November 4 ■ 2019

## FROM THE VIDARBHA COLLEGES

# M P College of Arts, Commerce, Sc, Deori



Guests present at the programme.

A programme was organised to pay tributes to Manoharbhai Patel College of Arts, Commerce and Science, Deori (Gondia). Principal Dr Arun K Zingare paid tributes to Sardar Vallabhbhai Patel on his 144th birth anniversary. The programme was held by Library Department and its head Dr Chandramani Gajbhiye. Asst Professor Umesh Chavhan, Department of English, Gayatri Gupta, Subodh Bhure, Geeta Ulkey, Vandana Lakhale, paid tributes to Sardar Patel. The teaching and non-teaching staff and students of the college worked hard for the programme.

The Hitavada
NAGPUR ■ Friday ■ January 10 ■ 2020

# VIDARBHA Line

M. B. PATEL COLLEGE DEORI
LIBRARY

## Manoharbhai Patel College, Deori



Students and teachers at Deori's Manoharbhai Patel College.

MANOHARBHAI Patel College, Deori, run by Gondia Education Society, celebrated birth anniversary of Savitribai Fule with enthusiasm. Under the guidance of Principal Dr Arun Zinghare, the programme was organised by Dr Varsha Gangane of Cultural Department at the library of the College. At the outset, the picture of Savitribai Fule was garlanded. Dr Varsha Gangane conducted the programme while Shilpa Savana proposed a vote of thanks. Dr K L Deshpande, Dr Chandramani Gajbhiye, Prof Bandhu Navdeve, Prof Bhaskar Dongare, Prof Gayatri Gupta, Geeta Uike, Vandana Lakhande, Manjeetsingh Nirvan, Subhodh Bhure, Sunil Khalode, Dattu Kagade and students were present on the occasion.

Colleges in Vidarbha can send their news items on
**vidarbhaline@gmail.com**

The Hitvada - 14-5-2020

# Manoharbhai Patel College, Deori



View of the workshop against superstition at village Shedepar.

THE National Service Scheme Department of the Manoharbhai Patel College, Deori, organised a workshop on 'Superstition eradication: Need of the hour' in village Shedepar, recently. The programme organised under guidance of Principal of the College Dr Arun Zingare of the College, was presided over by Dr Prakash Dhote of NP Waghaye College, Chopa. Dr Suajata Taram, Medical Officer and sunanda Bhure of Manoharbhai Patel Junior college guided the workshop. Speaking on the occasion, Dhote explained how rumours about someone knowing witchcraft are spread and sometimes people have also lost lives due to it, through examples. Dr Taram elaborated on how using traditional techniques and lifestyle are causing problems for the health of rural and tribal women. Dr Bhure said that the greatest force around is Nature and one has to think logically. Anshul Amrutkar conducted the programme. Prof Ashish Gadve delivered introductory speech while Sunita Rangari proposed a vote of thanks.

Colleges in Vidarbha can send their news items on
vidarbhaline@gmail.com

मराठी दैनिक
लोकजन

दि.21 ऑगस्ट 2021

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात सदभावना दिवस साजरा



देवरी:- गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित मनोहरभाई पटेल कला-वाणिज्य - विज्ञान महाविद्यालय देवरी येथे माजी प्रधानमंत्री स्व.राजीव गांधी यांचा जयंती दिवस 'सदभावना दिवस 'म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी सदभावना दिवसाच्या प्रतिज्ञे चे वाचन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना तसेच सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो प्रमुख प्रा. सुनीता रंगारी यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. वर्षा गंगणे यांनी प्रतिज्ञा वाचन केले व त्यापाठोपाठ उपस्थित प्राध्यापकांनी प्रतिज्ञेचे वाचन केले .सदर कार्यक्रमात कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले.काही निवडक विद्यार्थिनी या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

सदभावना दिन साजरा करण्यासाठी सुनील खालोदे, गायत्री गुप्ता ,मंजित निर्वाण तसेच लक्ष्मीकांत भोयर यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा.आशिष गडवे यांनी केले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

दि. 10 जून 2021

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा रा.से.यो.तर्फे मार्गदर्शनपर कार्यक्रम



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४८ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन माध्यमाद्वारे आयोजित या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. जयपाल चव्हाण सहभागी झाले होते. 'शिवाजी राजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे होते. सामान्य जनतेच्या कल्याणासाठी होते. राज्याभिषेक दिन साजरा करतांना राज्यकर्त्यांनीच नव्हेतर सर्वांनी याचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.झिंगरे यांनी 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य आकारला आणण्यासाठी केलेले अथक प्रयत्न, सर्वस्व हिरावल्यानंतरही फीनिक्स पक्षाप्रमाणे झेप घेऊन स्वराज्याची उभारणी करण्याची त्यांची झुंझार वृत्ती' याचे वर्णन केले.

यावेळी डॉ.देवेन्द्र बिसेन, डॉ. के.एल.देशपांडे, डॉ.चंद्रमणी गजभिये, डॉ.सचिन चौरासिया, डॉ.अभिनंदन पाखमोडे, डॉ.सुधीर भांडारकर, डॉ.त्रिमुर्ती लांबट आदि प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सुनिता रंगारी यांनी केले तर आभार प्रदर्शन आशिष गडवे यांनी केले. संचालन अंशूल अमृतकर याने केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. दामिनी रामरामे या विद्यार्थीनीने राष्ट्रगीत सादर केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांनी मार्गदर्शनपर कार्यक्रमापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी शिक्षकेत्तर कर्मचारी मनजितसिंग निर्वाण, गीता उईके, वंदना लाखडे, दत्तू कागदे, माधुरी गुप्ता उपस्थित होते.

# देशाच्या एकात्मतेसाठी निःस्वार्थ भावनेने सेवा करणे महत्वाचे– प्राचार्य डॉ. अरूण

## ग्राम भागी येथे रासेयो शिबिराचे समापन



देवरी:– येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देवरी च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबीर संपन्न झाले. ''ग्रामोन्नती व स्वच्छता अभियानाकरिता युवाशक्ती'' या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय शिबिरात रॅली. श्रमदान, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, नृत्य स्पर्धा, व्याख्याने, असे विविध उपक्रम पार पडले.

समारोपीय कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांनी रासेयो शिबिरार्थ्यांचे अभिनंदन केले. ''रायेयो च्या स्वयंसेवकांनी समाजात वावरताना निःस्वार्थ भावनेने कार्य केले पाहिजे, तरच देशात एकात्मता निर्माण होऊ शकते'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. शिबिराच्या नियोजनबद्ध आयोजनासाठी त्यांनी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. आशीष गडवे यांचे कौतुक केले. समारोपीय कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. चंद्रमणी गजभिये, गोटाबोडी सरपंच मनोहर राऊत, तसेच उपसरपंच दीपम बावनथडे उपस्थिती होते. विपरीत परिस्थितीतही काम करण्याचे व टिकाव धरण्याचे प्रशिक्षण रासेयो शिबिरातून प्राप्त होते, असे उद्गार डॉ. चंद्रमणी गजभिये यांनी याप्रसंगी बोलताना काढले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक भाषणातून आशिष गडवे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना शिबिरातून वाव मिळतो असे सांगितले. आपल्या मनोगतातून अश्विनी लाडे या विद्यार्थिनीनें शिबिरामुळे स्वतःचा व्यक्तिमत्व विकास घडून आल्याचे सांगितले.

अहवाल वाचन शुभम दरवडे या शिबिरार्थ्याने केले. सुनीता रंगारी यांनी सर्व गावकरी, व शिबीर यशस्वी होण्यासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांना पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी डॉ. अभिनंदन पाखमोडे, उमेश चव्हाण, भास्कर डोंगरे, जयंत राणे, अमित भुते हुमेश भोयर, तसेच मंजितसिंग निर्वाण, सुनील खलोदे, सुबोध भुरे, गीता उईके, वंदना लाखडे, दत्तू कागदे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश बिनायक, प्रगती पंधरे, शुभम बनकर, आशीष साखरे, अश्विनी लाडे, प्रियज्ञ डोंगरे, रेणु तिवारी इत्यादी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पटेल महाविद्यालयात डॉ.ताराम यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन




कार्यक्रमाला उपस्थित डॉ. सुजाता ताराम, वर्षा गंगणे, सुनिता रंगारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित मनोहरभाई पटेल कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालंय देवरी येथे आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तसेच महिला सेल यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.डॉ.वर्षा गंगणे, महिला सेलप्रमुख, तसेच रासेयो अधिकारी प्रा.सुनीता रंगारी यांनी आयोजित केली होते.

मार्गदर्शनासाठी मुल्ला प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कार्यरत डॉ.सुजाता ताराम यांना आमंत्रित करण्यात आले होते. महाविद्यालयात रासेयोतर्फे सिकलसेल, थायरॉइड, तसेच हिमोग्लोबिन टेस्ट शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १०० पैकी ४ विद्यार्थी सिकलसेल ग्रस्त निघाले, तसेच बहुतांश विद्यार्थी-विद्यर्थिनींचे हिमोग्लोबीन कमी आढळून आले. यावर उपाययोजना म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. आहार, पोषक तत्त्वे, रक्त वाढविण्यासाठी उपाय, कोरोनापासून बचाव, स्वच्छता आणि इतर अनेक मुद्द्यांवर डॉ.ताराम यांनी मार्गदर्शन केले. सोप्या आणि सकारात्मक भाषणातून अनेक विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वर्षा गंगणे यांनी मांडले. संचालन प्रा.सुनीता रंगारी यांनी तर आभार डॉ.शुभांगी मुनघाटे यांनी मानले.

मराठी दैनिक

दि. 23 मार्च 2022

PATEL COLLEGE LIBRARY DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबीर उद्घाटन थाटात

देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष वार्षिक शिबिराचा उदघाट्न सोहळा ग्राम भागी येथे पार पडला. ग्रामोन्नती व स्वच्छता अभियानाकरिता युवाशक्ती' या संकल्पनेवर आधारित या सात दिवसीय शिबिराच्या उदघाट्कीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे उपस्थित होते. यावेळी भागी गावचे पोलीस पाटील विनोद अमृतकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन, दीपप्रज्वलनाने करण्यात आली. रिबीन कापून पाहुण्यांनी



कार्यक्रमाचे रीतसर उदघाट्न केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांनी रासेयोच्या स्थापनेमागची महात्मा गांधीजींची भूमिका विशद केली. स्वयंसेवकांनी शिस्तीचे पालन करुन, गावकऱ्यांशी विनम्रतेने वागून शिबीर यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. पोलीस पाटील विनोद अमृतकर यांनी शिबिरासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले व शिबिरासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

रासेयो कार्यक्रम अधिकारी सुनीता रंगारी यांनी प्रास्ताविक भाषण केले. कोरोना काळानंतर पहिल्यांदा एकत्रित येऊन होणाऱ्या या शिबीर आयोजनामागची आपली भूमिका मांडली. युवांनी रासेयो च्या कार्यातून स्फूर्ती घेऊन विधायक क्रांती केली पाहिजे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन कु.सालेहा खान या विद्यार्थिनीने केले. शिबीर प्रमुख कार्यक्रम अधिकारी गडवे यांनी आभार व्यक्त केले. शिबिरासाठी मदत करणारे स्वयंसेवक राजेश विनायक, शुभम बनकर, प्रगती पंधरे, बिंदिया कोटवार, अश्विनी लाडे तसेच माजी विद्यार्थी अंशुल अमृतकर यांचे विशेष आभार त्यांनी मानले.

एन.एस.एस.क्लॅपिंग ने तसेच पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी अश्विनी कराडे, रेणू तिवारी, आशीष साखरे इत्यादी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत व एन.एस.एस. गीत सादर केले. महाविद्यालय विकास कमिटी चे सदस्य नरेंद्र जैन तसेच ग्रामपंचायत गोटाबोडीचे सरपंच मनोहर राऊत यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

M. B. PATEL COLLEGE LIBRARY

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात सदभावना दिवस साजरा



देवरीः- गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित मनोहरभाई पटेल कला-वाणिज्य - विज्ञान महाविद्यालय देवरी येथे माजी प्रधानमंत्री स्व.राजीव गांधी यांचा जयंती दिवस 'सदभावना दिवस 'म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी सदभावना दिवसाच्या प्रतिज्ञे चे वाचन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना तसेच सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो प्रमुख प्रा. सुनीता रंगारी यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. वर्षा गंगणे यांनी प्रतिज्ञा वाचन केले व त्यापाठोपाठ उपस्थित प्राध्यापकांनी प्रतिज्ञेचे वाचन केले .सदर कार्यक्रमात कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले.काही निवडक विद्यार्थिनी या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

सदभावना दिन साजरा करण्यासाठी सुनील खालोदे, गायत्री गुप्ता ,मंजित निर्वाण तसेच लक्ष्मीकांत भोयर यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा.आशिष गडवे यांनी केले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

लोकमत मराठी

दि.21 ऑगस्ट 2021

LIBRARY ... DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालय

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४८ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन माध्यमाद्वारे आयोजित या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून इतिहास विभागप्रमुख डॉ. जयपाल चव्हाण सहभागी झाले होते. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे होते. सामान्य जनतेच्या कल्याणासाठी होते. राज्याभिषेक दिन साजरा करताना राज्यकर्त्यांनीच नव्हे तर सर्वांनी याचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी डॉ. देवेंद्र बिसेन, डॉ.के.एल.देशपांडे, डॉ. चंद्रमणी गजभिये, डॉ. सचिन चौरसिया, डॉ. अभिनंदन पाखमोडे, डॉ. सुधीर भांडारकर, डॉ. त्रिमूर्ती लांबट आदी प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. आशिष गडवे यांनी केले. संचालन अंशुल अमृतकर याने केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




छत्रपती शिवाजी महाराजांच्या छायाचित्राचे पूजन करताना डॉ. अरुण झिंगरे.

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्र

**देवरी, ता. ७ :** येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान सप्ताह व महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून 'भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संवैधानिक भूमिका' या विषयावर ऑनलाइन पद्धतीने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. चंद्रमनी गजभिये व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. आशीष गडवे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून नरेंद्र तिडके महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीकांत भोवते उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. झिंगरे यांनी सागरातील पाण्याचा प्रत्येक थेंब म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या ज्ञानाचा एक-एक पैलू होय, असे मत व्यक्त केले. डॉ. भोवते यांनी अभ्यासपूर्ण भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानामुळे देशाचे हित तर साधले गेलेच, शिवाय भारतीय संविधानाची छाप जगातील अनेक देशांच्या संविधानावर पडली, इतकेच नव्हे, तर जागतिक मानवाधिकार संघटनेच्या जाहीरनाम्यात भारतीय संविधानातील तत्त्वांचा समावेश करण्यात आल्याचे महत्त्वपूर्ण विवेचन केले.

पुढे बोलताना डॉ. भोवते यांनी भारतीय संविधानाला अपेक्षित सामाजिक लोकशाही अस्तित्वात आल्याशिवाय राजकीय व आर्थिक लोकशाही देशात तग धरू शकणार नाही आणि त्यासाठी देशातील नागरिकांनी जात, धर्म, पंथ याच्या पलीकडे जाऊन राष्ट्रवादाची भावना जोपासली पाहिजे, असे मत व्यक्त केले. सत्ताधाऱ्यांनी प्रामाणिकपणे संविधान लागू केले तर देश प्रगतीच्या शिखरावर पोहोचू शकतो, पण दुर्दैवाने असे होताना दिसत नाही, याची खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक करताना प्रा. सुनीता रंगारी यांनी संविधान जाळण्यापर्यंत मजल गेलेला आपला देश एका नव्या पारतंत्र्याकडे वाटचाल करू लागला आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. डॉ. चंद्रमनी गजभिये यांनी डॉ. श्रीकांत भोवते यांचा परिचय करून




देवरी : ऑनलाइन चर्चासत्रात सहभागी मान्यवर.

देताना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. या राष्ट्रीय चर्चासत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांचे आभार प्रा. आशीष गडवे यांनी मानले. यशस्वितेसाठी प्रा. जयंत राणे, प्रा. हुमेश भोयर, डॉ. देवेंद्र बिसेन, डॉ. अभिनंदन लाखमोडे, प्रा. शुभांगी मुनघाटे यांनी सहकार्य केले.

लोकरंजन
गोंदिया सोमवार ३१ जानेवारी २०२२

## मतदार नोंदणी आणि मतदान करणे अनिवार्य-प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे

देवरीः- स्थानिक मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षते खाली दिनांक २५ जानेवारी २०२२ ला 'राष्ट्रीय मतदार दिवस' कोरोना नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रोफेसर डॉ. देवेंद्र बिसेन, डॉ. सचिन चौरसिया, डॉ. चंद्रमणी गजभिये, आशिष गढवे, उमेश चव्हाण, शुभांगी मुनघाटे आणि इतरही प्राध्यापक तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते. सुनिता रंगारी यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले. डॉ. जयपाल चव्हाण यांनी प्रास्ताकि भाषण केले. ते म्हणाले, आपल्या देशाच्या मजबूती करिता आणि देशातील संपूर्ण बांधवांचेयोग्य हित जोपासण्यासाठी लोकशाही शासन प्रणाली अतिशय योग्य आहे. कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांकडून मतदारांसाठी असलेल्या प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुला, मुलीनी मतदार नोंदणी करावे आणि देशात होणा-या ग्रामपंचायतीपासून तर लोकसभेच्या निवडणूकीत योग्य उमेदवारांना मतदान करावे असे आवाहन ही केले. याकरिता समाजातील जाणत्या आणि तरूण, तरूणींनी पुढाकार घेतल्यास लोकशाही शासन व्यवस्था नक्कीच बळकट होईल. सुनिता रंगारी यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

देवरीः- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालयात ७३ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारोहाचे आयोजन व नियोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे करण्यात आले. प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला व ध्वजाला सामूहिक राष्ट्रगीताने मानवंदना देण्यात आली. तत्पूर्वी सामूहिकरित्या सांविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. झिंगरे यांनी संविधानानुसार सर्वांनी आपल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण व कर्तव्याचे पालन केले पाहिजे, असे आवाहन केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सुनीता रंगारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन केले. सहकार्यक्रम अधिकारी आशिष गडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सलेहा खान या विद्यार्थिनीने सांविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले तर मोहित अग्रवाल याने संचलन केले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व काही विद्यार्थी उपस्थित होते. कोरोनाचे नियम पाळून कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी ग्रंथपाल डॉ. चंद्रमनी गजभिये, कर्मचारी सुनील खलोदे, तसेच अश्विनी लाडे, बिंदीया कोटवार, मोहित झिंगरे, काजल परिहार या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

M. B. PATEL COLLEGE LIBRARY

# सॅनिटरी नॅपकिनच्या वापराबाबत मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...

देवरी ■ येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी नॅपकिनच्या वापराबाबत, वापरल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटीबद्दल मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमाला महिला सेलच्या अध्यक्षा डॉ. वर्षा गंगणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी, प्रा. शुभांगी मुनघाटे उपस्थित होत्या. विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनच्या वापराबाबत माहिती दिली. वापरल्यानंतर सॅनिटरी नॅपकिन कुठेही फेकल्यामुळे [illegible] प्रदूषणात वाढ होते. या वेळी सर्व विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.

मराठी दैनिक
लोकजन
दि.8 ऑक्टोबर शुक्रवार 2021

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात, म.गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी



दवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयात महात्मा गांधी यांची १५२ वी व देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांची ११८ वी जयंती राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली आभासी पद्धतीने अभिवादनाचा आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.झिंगरे यांनी म. गांधी व लाल बहादूर शास्त्री या दोन्ही विभूतींच्या जीवनकायाचा आढावा घेतला. 'महात्माजी आणि शास्त्रीजी या दोघांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना सहकार्यक्रम अधिकारी आशीष गडवे यांनो मांडले तर संचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी सुनीता रंगारी यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.के.एल. देशपांडे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक गोंदिया गुरूवार २२ सप्टेंबर २०२२
लोकजन

LIBRARY COLLEGE

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात समान संधी केंद्रतर्फे शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शन



देवरीः- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'समान संधी केंद्र' या विभागामार्फत महाविद्यालयातील शिष्यवृत्तीधारक सर्व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे डॉ.अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली समान संधी केंद्र समन्वयक सुनिता रंगारी तसेच सदस्य डॉ.चंद्रमणी गजभिये व आशिष गडवे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयाचे लिपीक सुबोध भुरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना 'नॅशनल पोर्टल अंतर्गत येणाऱ्या भारत सरकारच्या शिष्यवृत्ती संदर्भात सतेच महाडिबीटी अंतर्गत येणाऱ्या शिष्यवृत्तीबद्दल' सविस्तर माहिती दिले. याव्रेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

मराठी दैनिक
लोकजागर
दि. 01 जुलाई 2022

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरी



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयात सामाजिक न्यायाचे व आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या 'समान संधी केंद्रातर्फे' या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.प्रा. सुनीता रंगारी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर आशीष गढवे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. छत्रपती शाहू यांच्या प्रतिमेस अध्यक्षांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

लोकमत
epaper.lokmat.com
बुधवार, दि. ८ जून २०२२


# मनोहरभाई पटेल महाविद्यालय

देवरी : येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन शिवस्वराज्य दिन म्हणून राष्ट्रीय



सेवा योजना विभागातर्फे साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमात सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अध्यक्षांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. झिंगरे यांनी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा जाणता राजा महाराष्ट्राला लाभणे, हे आपले भाग्य आहे, असे उद्‌गार काढले. संचालन रासेयो अधिकारी प्रा. सुनीता रंगारी यांनी केले. आभार प्रा. आशीष गडवे यांनी मानले.

लोकजागर
दि. 24 जून 2022

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त व्याख्यान व योगासने



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २० जूनला योग आणि युवा स्वास्थ्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मुल्ला आरोग्य केंद्रातील योगशिक्षिका सौ. मनीषा मडावी प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. झिंगरे यांनी निरामय आरोग्य हीच यशस्वी आयुष्याची गुरूकिल्ली आहे, असा संदेश आपल्या भाषणातून दिला.

यावेळी योगशिक्षिका मनीषा मडावी यांनी सूर्यनमस्काराच्या बारा आसनांचे प्रात्याक्षिक करून दाखविले आणि शरीर स्वास्थ्यासाठी त्याचे महत्व प्रतिपादन केले त्याचप्रमाणे मनःस्वास्थ्यासाठी ध्यान आणि ओमकाराचे महत्व त्यांनी पटवून दिले. यावेळी ग्रंथपाल डॉ. चंद्रमणी गजभिये प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर प्रा. आशीष गडवे यांनी आभार मानले. २१ जून ला आंतरराष्ट्रीय योग दिवस रासेयो विभागातर्फे मोठया उत्साहात प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या मोठया उपस्थितीत साजरा आला. प्रा. आशिष गडवे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले

तरुण भारत
नागपूर, रविवार, २५ सप्टेंबर २०२२

M. B. PATEL COLLEGE LIBRARY DEORI

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात भाषण स्पर्धा

◆ देवरी, २४ सप्टेंबर

येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत राष्ट्रीय पोषण महानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी, आशिष गडवे यांनी केले.


कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोषण व आरोग्याशी निगडित ॲनिमिया, कुपोषण, संतुलित आहार, प्रथिने, कर्बोदके, आरोग्य स्वच्छता आदी विषयांवर मते मांडली.

डॉ. झिंगरे यांनी, मानवी शरीराला जीवित ठेवण्यासाठी जी ऊर्जा लागते, ती निर्माण होण्याची कारणमीमांसा स्पष्ट केली व पोषण आहाराबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात परीक्षक म्हणून डॉ. सचिन चौरसिया उपस्थित होते. स्पर्धेत विकास खैरे, सालेहा खान, शुभम दरवडे यांनी अनुक्मे प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. डॉ. सचिन चौरसिया यांनी विजेत्यांचे व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी आशिष साखरे याने केले. आभारप्रदर्शन विद्यार्थीनी अस्मिता कोसरकर हिने केले. ◄*(तभा वृत्तसेवा)*

# काजलने पटकाविला स्पर्धेत प्रथम क्रमांक

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचा उपक्रम



निबंध स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थिनींसोबत शिक्षक.

लोकमत न्यूज नेटवर्क

**देवरी :** मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इको क्लबच्या वतीने आझादी का अमृत महोत्सवअंतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी व प्रा. आशिष गडवे यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत 'हवामान बदल', 'अक्षय ऊर्जा' व 'प्रदूषणाचे वाढते दुष्परिणाम व त्यावर आळा', हे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निबंध परीक्षणाचे कार्य अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा गंगणे यांनी केले. या स्पर्धेत काजल येल्ले या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला. कार्यक्रमासाठी रासेयो स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात समान संधी केंद्रामार्फत विविध स्पर्धा

देवरी:– येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य महाविद्यालयात समान संधी केंद्र समन्वयक प्रा. सुनिता रंगारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शन व स्वर्ण स्पर्धा व पोस्टर स्पर्धा यांचे आयोजन केले.

सामाजिक न्याय पर्व मध्ये समान संधी केंद्रात नशामुक्त भारत अभियान अंतर्गत समान संधी केंद्रातर्फे महाविद्यालयात 'युवकांमधील वाढती व्यसनाधीनता' या विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद या स्पर्धांना प्राप्त झाला.



वक्तृत्व स्पर्धेत कु.अस्मिता केसरकर, जयेंद्र डोकरमारे व प्रांजली शामकुंवर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथमत्र द्वितीय व तृतय स्थान प्राप्त केले. आजच्या युवा वर्गामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्यामुळे घर-संसार उध्वस्त होत आहेत. खर्रा, गुटखा, दारु, सिगारेट या व्यसनांमुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे, असे वक्तव्य विद्यार्थ्यांनी या प्रसंगी केले. निबंध व पोस्टर स्पर्धेत कु. प्रणाली मरस्कोल्हे या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना 'प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.चंद्रमणी गजभिये, डॉ. शुभांगी मुनघाटे,सुबोध भूरे तसेच प्रियज्ञ डोंगरे,आशिष साखरे, निखील दाणे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# रासेयो स्वयंसेवकांकडून प्रेरणा घेऊन गावाचा विकास साधावा-सरपंच लखनलालजी पंधर

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचे रासेयो शिबिराचे उदघाटन थाटात



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ग्राम-शहर विकासासाठी युवाशक्ती शिबिराचे ग्राम नवाटोला येथे ग्रामपंचायत भर्रेगाव चे सरपंच लखनलालजी पंधरे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले .

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उदघाटकीय कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ.देवेंद्र बिसेन, डॉ.अभिनंदन पाखमोडे, भर्रेगावचे उपसरपंच जयेंद्र मेंढे, पोलीस पाटील संध्याताई बहेकार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रुपलालजी नेताम, तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते .

आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. झिंगरे यांनी शिबिरार्थ्यांनी 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' या भूमिकेतून कार्य करावे असे आवाहन केले. आपल्या उदघाटकीय भाषणातून लखनलालजी पंधरे यांनी रासेयो शिबिरार्थ्यांचे गावात स्वागत केले आणि रासेयो स्वयंसेवकांकडून गावकऱ्यांनी प्रेरणा घेऊन गावाचा विकास साधावा, असा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. रासेयो कार्यक्रम अधिकारी सुनीता रंगारी यांनी सात दिवसीय वार्षिक शिबिराची संकलपना आपल्या प्रास्ताविक भाषणातून मांडली. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. देवेंद्र बिसेन् यांनी रासेयो च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होणारे फायदे सांगितले तर डॉ. अभिनंदन पांखमोडे यांनी रासेयो च्या 'माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी' या ब्रीदवाक्याचा अर्थ उलगडून दाखविला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे संचालन डॉ. दिपन गोंदोले यांनी केले तर शिबीर प्रमुख प्रा. आशिष गडवे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

याप्रसंगी शिबिरार्थी विद्यार्थिनींनी विद्यापीठ गीत तसेच रासेयो लक्ष्य गीत सादर केले. सामूहिक राष्ट्रगीताने उदघाटकीय कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम दरवडे, सलेहा खान, माही इंगळे, अस्मिता कोसरकर, आशिष साखरे, इत्यादी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक
करून लोकजन कार्यालय,लोकजन
०७१८२-२५१४२५,२५०२३१ भ्रम
ई-मेल-lokjan

5 मराठी दैनिक लोकजन

दि. 07 मार्च 2023

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयाचे नवाटोला येथे विशेष रासेयो शिबिर संपन्न

देवरी:– येथील मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योगविभागाद्वारे ग्राम नवाटोला येथे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रंगारी व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष गडवे यांनी या शिबिराचे आयोजन केले. सात दिवसीय शिबिरात विविध विषयांवर बौद्धिक मार्गदर्शनपर कार्यक्रम जनजागृतीपर रैली प्रबोधनपर नाटके व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले,

आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षाचे औचित्य साधून २ भरड धान्यांची उपयोगिता २ या विषयावरील व्याख्यानात डॉ.वर्षा गंगणे यांनी १ भरड धान्यांचे आपल्या आहारातील महत्व व एकंदर आरोग्यासाठी असलेली उपयोगिता विशद केली. आपली लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने नाव मतदारांची भूमिका लक्षात ठेवून या विषयावर डॉ. शुभांगी मुनघाटे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले. जीवनात योगाचे महत्व लक्षात घेऊन श्रीमती सुमती डोलारे नवीन डोलारे व त्याच्या संपूर्ण टीमने शिबिरार्थ्यांना योग ध्यान जीबरीस इत्यादीबद्दल सविस्तर माहिती दिली व प्रात्यक्षिक करवून घेतले. वाढत चाललेली बेरोजगारी व नैराश्य यांना दूर करण्यासाठी उद्योजकता विकास व कौशल्य यावर नेहरू युवा केंद्र संडक अर्जुनी चे शुभम मेश्राम व श्रद्धा शहारे यांनी शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. दीपन गोंदोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी विविध कुटीर उद्योग कुक्कुटपालन इत्यादींची माहिती सांगितली.

देवरी ग्रामीण रुग्णालयातील वैदयकीय अधिकारी डा.मेघा फटींग यांनी शिबिरार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचे



निराकरण केले. शिबिर दरम्यान मुल्ला व देवरी ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने आबीद खान खोब्रागडे यांनी शिबिरार्थी व गावकरी यांचे ब्लड सॅम्पल घेऊन सिबीसी, थायरॉईड हिमोग्लोबिन चे निदान केले.

बौदिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांसोबत शिबिरात सांस्कृतिक पर कार्यक्रम सादर करण्यात आले देशभक्तीपर गीत लावणी एव गोंडी नृत्य तबलावादन प्रश्नमंजुषा यासारख्या कार्यक्रमांनी शिबिरात रंगत आणली.

शिबिराचा समारोप प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जयपाल चव्हाण डॉ. सुधीर भांडारकर डॉ. अभिनंदन पाखमोडे अंगणवाडी सेविका सौ. सरिता रहिले ग्राम पंचायत सदस्य विद्याताई खोटेले आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. झिंगरे यांनी रासेयो ही विदयार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविणारी कार्यशाळा आहे असे उद्गार काढले. यावेळी रासेयो तर्फ जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळेला प्रचार्यांच्या हस्ते पाच पुस्तकांचा संच भेट म्हणून देण्यात आला. सलेहा खान या विद्यार्थिनीने अहवाल वाचन केले. शुभम दरवडे आशिष साखरे एप्रतिमा बहेकार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबीर प्रमुख प्रा. आशिष गडवे यांनी मांडले तर संपूर्ण शिबिराच्या यशस्वीतेसाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार मानले. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन ग्रीष्मा ब्राह्मणकर हिने केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. भास्कर डोंगरे डॉ. दिपन गोंदोले सलोनी वाटगुरे अस्मिता कोसरकर आशिष साखरे, शुभम् दरवडे सलेहा खान नियम डोंगरे, मोहित झिंगरे विकास खैरे इत्यादी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

लोकमत, 12/04/2023

# मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महा.



देवरी : मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात, ग्रंथालय विभाग आणि समान संधी केंद्र कार्यक्रम अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक डॉ. चंदमणी गजभिये यांनी मांडले. याप्रसंगी डॉ. देवेंद्र बिसने, डॉ. वर्षा गंगणे, डॉ. के.एल. देशपांडे, डॉ. जे.पी. चव्हाण, प्रा.सुनीता रंगारी, प्रा.शुभांगी मुनघाटे, प्रा.भाष्कर डोंगरे, प्रा. उमेश चव्हाण, प्रा.देवकाटे, प्रा. नीलचंद पटले, प्रा. संदीप राणे शिक्षकेतर कर्मचारी दत्तू कागदे इत्यादी उपस्थित होते. आभार प्रा. सुनीता रंगारी यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी कमलेश उईके आणि इतर विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

देशोन्नती

गोंदिया, शुक्रवार, दि. ६ जानेवारी २०२३

# सर्व सामाजिक घटकांना घेऊन पुढे जाणे सावित्रीबाईंना अपेक्षित होते : डॉ . देवेंद्र बिसेन




**देवरी** ■ येथील मनोहरभाई पटेल कला , वाणिज्य , व विज्ञान महाविद्यालय , देवरी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्राचार्य डॉ . अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ . देवेंद्र बिसेन यांनी

सावित्रीबाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतांना सावित्रीबाईंना सर्व सामाजिक घटकांनी एकत्रितपणे पुढे जाणे अपेक्षित होते , हे सत्य अधोरेखित केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा . सुनीता रंगारी यांनी शिक्षण हे केवळ रोजगारासाठी नसून मनुष्यत्व मिळवण्यासाठी आहे , या सावित्रीबाईच्या विचारांना उजाळा दिला . रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा . आशिष गडवे यांनी सावित्रीबाई या खऱ्या अर्थाने भारतरत्न होत्या असे प्रतिपादन केले. यावेळी झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत विकास खैरे , सालेहा खान , निकिता भेंडारकर , मयूर मेश्राम, पल्लवी लांजेवार इत्यादी स्वयंसेवकांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्य कर्तृत्वावर प्रकाश टाकला . कु . सालेहा खान या विद्यार्थिनीने सावित्रीबाई यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेतला. स्पर्धेचे परीक्षण डॉ . चांद्रमनी गजभिये यांनी केले . कु . सालेहा खान या विद्यार्थिनीला प्रथम क्रमांक घोषित करण्यात आला . विद्यार्थ्यांच्या भाषणांचे परीक्षण करताना डॉ . गजभिये यांनी जिच्या हाती सावित्रीबाईंच्या विचारांची दोरी ती जगाला उद्धारी असा संदेश दिला . कार्यक्रमाचे संचालन कु . सोनाली जांभुलकर हिने केले तर कु . नेहा इंगळे हिने उपस्थितांचे आभार मानले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय गुप्ता , तुषार राजगिरे यांनी परिश्रम घेतले . सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

# सर्व सामाजिक घटकांना घेऊन पुढे जाणे सावित्रीबाईंना अपेक्षित होते – डॉ.देवेंद्र बिसेन

## * मनोहरभाई पटेल महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी
## * वक्तृत्व स्पर्धेत सलेहा खान प्रथम



देवरी:– येथील मनोहरभाई पटेल कला ,वाणिज्य ,व विज्ञान महाविद्यालय ,देवरी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्राचार्य डॉ.अरुण झिंगरे यांच्या मार्गदर्शनात क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली .

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ.देवेंद्र बिसेन यांनी सावित्रीबाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतांना सावित्रीबाईना सर्व सामाजिक घटकांनी एकत्रितपणे पुढे जाणे अपेक्षित होते ,हे सत्य अधोरेखित केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनीता रगारी यांनी शिक्षण हे केवळ रोजगारासाठी नसून मनुष्यत्व मिळवण्यासाठी आहे,या सावित्रीबाईच्या विचारांना उजाळा दिला. रासेयो सह कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष गडवे यांनी सावित्रीबाई या खऱ्या अर्थाने भारतरत्न होत्या असे प्रतिपादन केले. यावेळी झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत विकास ढोरे ,सलेहा खान, निकिता भेंडारकर ,मयूर मेश्राम, पल्लवी लांजेवार इत्यादी स्वयंसेवकांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्य कर्तृत्वावर प्रकाश टाकला. कु.सलेहा खान या विद्यार्थिनीने सावित्रीबाई यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेतला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. चांद्रमनी गजभिये यांनी केले. कु.सलेहा खान या विद्यार्थिनीला प्रथम क्रमांक घोषित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या भाषणांचे परीक्षण करताना डॉ.गजभिये यांनी स्त्रियांच्या हाती सावित्रीबाईच्या विचारांची दोरी ती जगाला उद्धारी असा संदेश दिला.

कार्यक्रमाचे संचालन कु. सोनाली जांभुलकर हिने केले तर कु.नेहा झाळे हिने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय गुप्ता, तुषार राजगिरे यांनी परिश्रम घेतले. सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

मराठी दैनिक लोकजन

दि. 1 मे 2023

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात समान संधी केंद्रामार्फत विविध स्पर्धा



देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य महाविद्यालयात समान संधी केंद्र समन्वयक प्रा. सुनिता रंगारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण झिंगरे यांच्या मार्गदर्शन व स्वर्ण स्पर्धा व पोस्टर स्पर्धा यांचे आयोजन केले.

सामाजिक न्याय पर्व मध्ये समान संधी केंद्रात नशामुक्त भारत अभियान अंतर्गत समान संधी केंद्रातर्फे महाविद्यालयात 'युवकांमधील वाढती व्यसनाधीनता' या विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद या स्पर्धांना प्राप्त झाला.

वक्तृत्व स्पर्धेत कु.अस्मिता केसरकर, जयेंद्र डोकरमारे व प्रांजली शामकुंवर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथमत्र द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. आजच्या युवा वर्गामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्यामुळे घर-संसार उध्वस्त होत आहेत. खर्रा, गुटखा, दारु, सिगारेट या व्यसनांमुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे, असे वक्तव्य विद्यार्थ्यांनी या प्रसंगी केले. निबंध व पोस्टर स्पर्धेत कु. प्रणाली मरस्कोल्हे या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.चंद्रमणी गजभिये, डॉ. शुभांगी मुनघाटे,सुबोध भूरे तसेच प्रियज्ञ डोंगरे,आशिष साखरे, निखील दाणे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मनोहरभाई पटेल महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी




देवरी:- येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती 'महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण झिंगरे यांच्या अध्यक्षतेखाली' सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन समान संधी केंद्र समन्वयक प्रा. सुनीता रंगारी यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. याप्रसंगी डॉ. देवेंद्र बिसेन, डॉ. के.एल. देशपांडे, डॉ. वर्षा गंगणे, डॉ. चंद्रमनी गजभिये, डॉ. भांडारकर, प्रा. आशिष गडवे, डॉ. अभिनंदा पाखमोडे, प्रा. उमेश चव्हाण, डॉ. नासरे, प्रा. सुरेखा वैरागडे, प्रा. प्रिया तिरपुडे, प्रा. सुवर्णा बनसुले, प्रा. अश्विनी फरकाडे, आदी प्राध्यापकगण व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी पुष्प अर्पण करून शाहू महाराजांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गजभिये यांनी केले. तर प्रा. गडवे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्तू कागदे यांनी परिश्रम घेतले.